# डेझी फ्लॉवरची लागवड म्हणजे वर्षभर नफा!



**प्रा. भूषण तायडे**
(मो.नं. ९७६६८०८३२४)
फुलशेती व लॅन्डस्केपिंग विभाग,
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय,
नाशिक





"डेझीचे पीक लागवडीनंतर अनेक वर्षे शेतात राहते. या पिकाच्या लागवडीपूर्वी हेक्टरी २० ते २५ बैलगाड्या चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत घालावे. पिकाला हेक्टरी १०० किलो नत्र, ७५ किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश द्यावे. स्फुरद आणि पालाशच्या पूर्ण मात्रा लागवडीनंतर एक महिन्याच्या अंतराने द्याव्यात. डेझी पिकाला हंगाम आणि जमिनीच्या मगदुरानुसार ७ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे."

उद्यानातील परिसर, इमारती आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पिवळ्या आणि निळसर रंगछटा असलेले डेझीचे ताटवे लावल्यास वर्षभर फुलत राहतात. डेझी फुलांचा रंग आकर्षक पिवळा असतो. दांडी लांब असते आणि फुलदाणीत ठेवल्यास ती जास्त दिवस टिकतात. त्यामुळे डेझी फुलाला भरपूर मागणी असते.

डेझीला सोलिडागो डेझी अथवा गोल्डन रॉड किंवा सोनतुरा असेही म्हणतात. आकर्षक पिवळ्या रंगामुळे, लांब दांड्यावर निमुळत्या होत गेलेल्या आणि एकामागून एक उमलत जाणाऱ्या फुलांच्या नैसर्गिक पुष्परचनेमुळे सोनतुऱ्याला फुलदाणीचे वैभव समजले



जाते. सोनतुऱ्याचे एक ते तीन फुलदांडे आणि इतर रंगांची फुले फुलदाणीत ठेवून केलेली पुष्परचना मन वेधून घेते. डेझी हे पीक बहुवर्षीय आहे. डेझीच्या फुलांना हार आणि गुच्छासाठी वर्षभर सतत मागणी असते आणि म्हणून डेझीच्या पिकाखालील क्षेत्र वाढवून भरपूर उत्पन्न मिळविण्यास चांगला वाव आहे.

**क्षेत्र** : डेझीच्या बहुसंख्य प्रकारांचे उगमस्थान उत्तर अमेरिकेत असून काही प्रकार दक्षिण अमेरिका, पश्चिम युरोप आणि आशिया खंडातील आहेत. महाराष्ट्रात डेझीची लागवड प्रामुख्याने पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर केली जाते.

**हवामान** : डेझीच्या फुलपिकाला भरपूर सूर्यप्रकाश आणि थोडे दमट हवामान चांगले मानवते. कडक थंडीमध्ये या फुलांना कमी बहार येतो. डेझीचे पीक काळ्या तसेच पाण्याचा चांगला निचरा होणाऱ्या सुपीक जमिनीत चांगले येते.

**जाती** : डेझीमध्ये अनेक प्रकार आणि जाती आहेत. त्यामध्ये माईचलमस डेझी, आफ्रिकन डेझी, इंग्लिश डेझी, स्पन सिल्व्हर डेझी, शास्ता डेझी, पेटेंट डेझी, गोल्डन रॉड इत्यादी प्रकार आढळतात. या प्रकारांत पिवळी, लाल, पांढरी, निळसर, गुलाबी, नारिंगी अशा मनमोहक रंगांची फुले येतात. महाराष्ट्रात सोलिडागो आणि माईचलमस हे प्रकार जास्त प्रचलित आहेत.

**अभिवृद्धी व वाढ** : डेझीची लागवड डेझीच्या जुन्या झाडाला फुटलेल्या फुटव्यापासून (सकर्स) करतात. लागवडीसाठी सकर्स काढताना पूर्वीचे पीक निरोगी असल्याची खात्री करून घ्यावी. कारण रोगट झाडांपासून घेतलेले सकर्स पुढे रोगाला लवकर बळी पडतात आणि चांगले उत्पादन मिळत नाही. बियांपासून देखील डेझीची लागवड केली जाते.

**लागवड** : डेझीची लागवड बागेत, इमारतीच्या प्रांगणात आणि रस्त्याच्या दुतर्फा करताना हंगामानुसार सुरवातीला जमीन चाळून भुसभुशीत करून घ्यावी आणि नंतर वाफे तयार करून डेझीची लागवड करावी. मोठ्या प्रमाणात शेतात लागवड करावयाची असल्यास उभी-आडवी नांगरट करावी, कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन सपाट करावी. डेझीची लागवड शक्यतोवर पावसाळ्यात सुरवातीला करावी. जमिनीत चांगले शेणखत मिसळून घ्यावे.

सोलिडागो डेझीला फुले येण्यासाठी कोणत्याही हंगामातील हवामान मानवते. त्यामुळे लागवड वर्षभरात कधीही करता येते. हे जास्त जोमाने वाढणारे असल्यामुळे दोन ओळीत ४५ ते ६० सें.मी. आणि एका ओळीत दोन झाडांमध्ये ४५ ते ६० सें.मी. अंतर



ठेवावे. माईचलमस प्रकाराच्या जातीत ४० x ४० सें.मी. तर बुटक्या प्रकारच्या जातीत ३० x ३० सें.मी. अंतर ठेवून लागवड करावी.

**खत व पाणी व्यवस्थापन**

डेझीचे पीक लागवडीनंतर अनेक वर्षे शेतात राहते. या पिकाच्या लागवडीपूर्वी हेक्टरी २० ते २५ बैलगाड्या चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत घालावे. पिकाला हेक्टरी १०० किलो नत्र, ७५ किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश द्यावे. स्फुरद आणि पालाशच्या पूर्ण मात्रा लागवडीनंतर एक महिन्याच्या अंतराने द्याव्यात. डेझी पिकाला हंगाम आणि जमिनीच्या मगदुरानुसार ७ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

**किडी व रोग**

डेझी पिकावर किडींचा प्रादुर्भाव अतिशय कमी प्रमाणात दिसून येतो. काही वेळा मात्र मावा, फुलकिडे आणि पाने खाणाऱ्या अळ्यांचा उपद्रव दिसून येतो. या किडींच्या नियंत्रणासाठी १० लिटर पाण्यात १५ मि.लि. मॅलिथिओन किंवा १५ मि.लि. डायमेथोएट (३०%) या प्रमाणात मिसळून २ ते ३ वेळा फवारणी करावी.

डेझीच्या फुलपिकावर भुरी रोगाचा उपद्रव दिसून येतो. रोगाची लागण झालेल्या पानांवर, खोडांवर आणि फुलांवर पांढऱ्या रंगाची पावडर दिसून येते. फुले



गळून पडतात, पाने वाळतात. या रोगाच्या नियंत्रणासाठी १० लि. पाण्यात १० ते १२ ग्रॅम कॅलिक्झिन अथवा कॅराथेन हे बुरशीनाशक मिसळून पिकावर फवारणी करावी.

**फुलांची काढणी व उत्पादन**

डेझी फुलपिकाला लागवडीनंतर दीड ते दोन महिन्यांनी फुले यायला लागतात आणि ती सतत फुलत राहतात. फुलांच्या दांड्यावरील खालची फुले उमलू लागताच फुलांचा दांडा जमिनीपासून खोडावर ४ ते ५ डोळे ठेवून छाटून घ्यावा. दांड्याची लांबी आणि फुलांचा रंग यानुसार प्रतवारी करावी. नंतर दहा ते बारा फुलदांडे एकत्र बांधून जुड्या तयार कराव्यात. सोलिडागो डेझीचे दरवर्षी सुमारे दर हेक्टरी २.५ ते ३ लाख फुलदांडे इतके उत्पादन मिळते. ■

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. आपले लेखन प्रसिद्ध झालेला अंक आमच्याकडून दर महिन्यात अवश्य पाठवला जातोच. मात्र काही वेळा निवासी पत्त्यात झालेला बदल, अपूर्ण पत्ता यांमुळे आपल्याकडे पाठवलेला अंक परत येतो. याकरिता शक्यतो लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती.

तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

आमचा पत्ता : पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**– संपादक, 'पूर्वा कृषिदूत'** ■